# 'टिस'कडून दोन वर्षांसाठी दलित विद्यार्थ्याचे निलंबन

## वारंवार गैरवर्तन आणि देशविरोधी भूमिका घेतल्याचा ठपका




**मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) :** वारंवार गैरवर्तन आणि देशविरोधी भूमिका घेतल्याचा ठपका ठेवत 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस'ने (टिस) 'पीएच.डी.'च्या रामदास केएस या दलित विद्यार्थ्याला दोन वर्षांसाठी निलंबित केले. तसेच देशातील 'टिस'च्या सर्व संकुलात प्रवेश करण्यास त्याला बंदी घातली आहे. यासंदर्भातील एक नोटीस रामदासला गुरूवार, १८ एप्रिल रोजी पाठविण्यात आली असून पुढील ३० दिवसांत स्वतःची बाजू मांडण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. 'टिस'ने हा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी प्रोग्रेसिव्ह स्टुडंट्स फोरम (पीएसएफ) व इतर विद्यार्थी संघटनांनी केली आहे.

'टिस'च्या कार्यालयाने रामदासला ७ मार्च रोजी कारणे दाखवा नोटीस पाठवली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील त्रुटी आणि केंद्र सरकारच्या विविध योजनांचा निषेध करण्यासाठी १२ जानेवारी रोजी युनायटेड स्टुडंट्स ऑफ इंडियाच्या नेतृत्वाखाली नवी दिल्लीतील संसदेवर मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात रामदास आणि 'टिस'मधील काही विद्यार्थी 'पीएसएफ'डून सहभागी झाले होते.

परंतु 'पीएसएफ' ही संघटना 'टिस'द्वारे मान्यताप्राप्त नाही. या मोर्चात सहभागी होऊन 'टिस'च्या नावाचा गैरवापर झाला आहे. तसेच २६ जानेवारी रोजी 'राम के नाम' या माहितीपटाच्या स्क्रिनिंगमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करणाऱ्या आशयाची पोस्ट अयोध्येतील राम मंदिर उद्घाटनाचा निषेध करण्याच्या उद्देशाने रामदासने सामाजिक माध्यमावर प्रसिद्ध केली होती. तसेच २८ जानेवारी २०२३ रोजी 'टिस'च्या मुंबई संकुलात बंदी असलेला माहितीपट दाखविणे, भगतसिंग स्मृती व्याख्यानासाठी वादग्रस्त वक्त्यांना बोलाविणे, 'टिस'च्या संचालकांच्या बंगल्याबाहेर रात्री उशिरा घोषणाबाजी करणे असे मुद्दे 'टिस' कार्यालयाकडून रामदासला पाठविण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहेत.

रामदास केएस कोण?

रामदास हा 'टिस'मधील स्कूल ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज विभागाचा 'पीएच.डी.'चा विद्यार्थी आहे. तसेच तो विद्यार्थी स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) केंद्रीय कार्यकारी समितीचा सदस्य व महाराष्ट्र राज्य समितीचा सहसचिव आहे. तसेच प्रोग्रेसिव्ह स्टुडंट्स फोरमचा (पीएसएफ) सदस्य व माजी सचिव आहे.

शैक्षणिक बाबींव्यतिरिक्त राजकीय कार्यक्रमांना प्राधान्य

रामदासने शैक्षणिक क्षेत्राव्यतिरिक्त इतर उपक्रम आणि राजकीय हेतूंनी प्रेरित कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित केले. त्यामुळे रामदासने शैक्षणिक बाबींना प्राधान्य देण्यासाठी 'टिस'च्या अधिकाऱ्यांकडून वारंवार लेखी सूचना व पत्रव्यवहार करण्यात आला. मात्र याकडे दुर्लक्ष करीत शैक्षणिक बाबींना प्राधान्य देण्यास रामदास अपयशी ठरला. तसेच 'टिस'च्या संकुलातील वसतिगृहात बेकायदेशीरपणे राहणेही सुरू ठेवले. त्यामुळे पीएच.डी.चे इतर विद्यार्थी वसतिगृहापासून वंचित राहिले. या सर्व प्रकरणी चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीने १७ एप्रिल रोजी अहवाल सादर केला आणि त्यानंतरच रामदासला दोन वर्षांसाठी निलंबित केल्याचे 'टिस' प्रशासनाने एक प्रसिद्धीपत्रक जारी करीत स्पष्ट केले आहे.

# मुंबईच्या पाणीसाठ्यात दिवसेंदिवस घट

## जलसाठा २२.६१ टक्क्यांवर, कपातीबाबत पालिकेची चालढकल



**मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) :** वाढणाऱ्या तापमानाबरोबरच मुंबईकरांना पाणी पुरवणाऱ्या जलाशयांतील पाणीसाठा झपाटयाने कमी होत आहे. आजघडीला धरणांत केवळ २२.६१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे धरणांमधील सुमारे तीन लाख २७ हजार २८९ दशलक्ष लिटर आणि राखीव जलसाठा पावसाळ्यापर्यंत पुरवून वापरावा लागणार आहे. या पार्श्वभूमीवर पाणीकपात लागू करणे आवश्यक असतानाही मुंबई महापालिका चालढकल करीत आहे. मुंबईकरांना अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या सात धरणांमधून दररोज ३,९५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो. गेल्या वर्षी समाधानकारक पाऊस पडल्यामुळे धरणांमध्ये वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा होता. मात्र, धरणांतील साठा वेगाने कमी झाल्याने अप्पर वैतरणातील ९१ हजार ३०० दशलक्ष लिटर आणि भातसातील एक लाख ३७ हजार दशलक्ष लिटर अतिरिक्त राखीव पाणी उपलब्ध झाले आहे. पालिकेच्या २० एप्रिलच्या आकडेवारीनुसार सातही धरणांमध्ये तीन लाख २७ हजार २८९ दशलक्ष पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र, भविष्यात उन्हाळयामुळे धरणांतील पाण्याचे बाष्पीभवन होऊन साठा खालावण्याची शक्यता आहे.

मेमध्ये निर्णय?

पावसाळा सुरू होईपर्यंत धरणांतील उपलब्ध साठा आणि राखीव साठयातील पाण्याचे नियोजन करूनच पाणी पुरवावे लागणार आहे. मात्र मे महिन्यात धरणांतील जलसाठयाचा आढावा घेऊन पुरवठयाचे नियोजन करण्यात येईल. त्यावेळच्या परिस्थितीनुसार पाणीकपात करायची का, किती टक्के करायची? जलतरण तलावांच्या पाणी वापरावर निर्बंध घालायचे का, याबाबत मे मध्ये निर्णय घेण्यात येईल, असे जल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

# वैशाली दरेकर यांनी दिली कल्याण पूर्वेतील चर्चला भेट



**कल्याण, दि. २१ (वार्ताहर) :** महाविकास आघाडी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना कल्याण लोकसभेच्या अधिकृत उमेदवार वैशाली दरेकर यांनी आज कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी येथील सेंट जुडस चर्चला भेट दिली.

यावेळी तेथील फादरची भेट घेत खिश्चन बांधवाशी संवाद साधला. यावेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख हर्षवर्धन पालांडे, शरद पाटील, राधिका गुप्ते आदी पदाधिकारी उपस्थित होते. कल्याण पूर्वेत खिश्चन बांधवांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांच्या पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न दरकेर करतांना दिसून आल्या.

त्याआधी सकाळी महावीर जयंती निमित्त जैन बांधवांची डोंबिवली येथे भेट घेतली. फडके रोड येथे पै लायब्ररीच्या वतीने आयोजित बुक स्ट्रीट उपक्रमाला हजेरी लावली.

शहाड गावठान जत्रा, सातारा जिल्हा ग्रामस्थ बैठक गोळवली आदी ठिकाणी देखील वैशाली दरेकर यांनी भेट देत मतदारांशी संवाद साधला.

# संदीप देसाई यांची विधानसभा समन्वयक पदी नियुक्ती

**कल्याण, दि. २१ (वार्ताहर) :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या लोकसभा निवडणूक २०२४ भिवंडी लोकसभा मतदार संघातील कल्याण पश्चिम विधानसभा मतदार संघाच्या समन्वयक पदी राष्ट्रवादीचे कल्याण मधील जेष्ठ पदाधिकारी संदीप देसाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे सरचिटणीस रविंद्र पवार यांनी ही नियुक्ती केली असून राष्ट्रवादीचे नेते, आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याहस्ते त्यांना हे नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक सुहास देसाई, उमेश बोरगावकर, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस, कोकण विभाग अध्यक्ष किरण शिखरे आदी पदाधिकारी उपस्थित होते. देसाई हे गेले अनेक वर्षे राजकारणात सक्रिय असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अनेक पदांवर काम केलं आहे.

# मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहनांचा वेग वाढणार,

## बोरघाटात आता ताशी ६० किमी वेगाने वाहने धावणार



**मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटात ताशी ५० किमी अशी वेगमर्यादा होती. आता त्यात वाढ करण्यात आली असून बोरघाटात ताशी ६० किमी अशी वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या नवीन वेगमर्यादेची अंमलबजावणी दोन दिवसांपासून सुरु झाली आहे. मुंबई ते पुणे द्रुतगती महामार्ग ९४ किमीचा असून या महामार्गावर प्रवास करताना हलक्या वाहनांना समतल भागात ताशी १०० किमी अशी वेगमर्यादा होती. तर ३५ ते ५२ किमीच्या बोरघाटात ताशी ५० किमी अशी वेगमर्यादा होती. अशावेळी समतल भागातून ताशी १०० किमी वेगाने येणाऱ्या वाहनांना बोरघाटात येताना ताशी ५० किमी वेग करणे अडचणींचे ठरत होते. त्यामुळे अपघातही होत होते.

ही बाब लक्षात घेता पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, रायगड परिक्षेत्र यांनी एक प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार बोरघाटातील वेगमर्यादा बदलण्याची आवश्यकता व्यक्त केली होती. या प्रस्तावाच्या अनुषंगाने १५ एप्रिलला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी), परिवहन विभाग, पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, रायगड परिक्षेत्र आणि इतर प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची एक बैठक झाली. या बैठकीत एकमताने बोरघाटातील वेगमर्यादा बदलण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आता महामार्गावर हलक्या वाहनांना समतल भागात ताशी १०० किमी तर बोरघाटात ताशी ६० किमी अशी वेगमर्यादा लागू करण्यात आली आहे. मागील दोन दिवसांपासून ही नवीन वेगमर्यादा लागू करण्यात आली आहे.

# शिवमुद्रा नृत्यालयाचा बहारदार कार्यक्रम सादर



**कल्याण, दि. २१ (वार्ताहर) :** राम नवमीच्या मुहुर्तावर डोंबिवली येथे चार वर्षापासून सुरू असलेल्या शिवमुद्रा नृत्यालयच्या संचालिका गुरू राधिका कुलकर्णी यांनी सावित्रीबाई फुले नाट्यगृहात भरतनाट्यावर आधारित नृत्याचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजलक्ष्मी शेठ, डोंबिवली टाईम्स साप्ताहिकाच्या कार्यकारी संपादिका विद्या कुलकर्णी, ठाणे जीवनदीपवार्ता दैनिकाचे कार्यकारी संपादक विजय यादव, आणि श्री दत्ता जोशी उपस्थित होते.

या कार्यक्रमात शिवमुद्राच्या विद्यार्थीनींनी हुलाहूप वापरून बहारदार भरतनाट्यम् सादर केले गेले. या खेरीज गणपती वंदना, राम जन्मला ग सखी, माऊली माऊली, रामा रघुनंदना सारख्या अभंगावर नृत्य सादर केले. दशावतार नृत्य हे या कार्यक्रमाचे आकर्षण होते. कार्यक्रम बहारदार करण्या साठी प्रसिद्ध गायिका श्रावणी महाजन यांना मनीष बेंबले यांनी तबल्यावर, की बोर्डवर अक्षय कावळे आणि विक्रांत तारे यांनी बासरीवर सुरेख साथ दिली. अतिशय देखण्या असलेल्या या कार्यक्रमात शिवमुद्रा नृत्यालयाच्या सर्व विद्यार्थीनींनी भाग घेऊन कार्यक्रमाला शोभा आणली.

या कार्यक्रमांसाठी गुरू राधिका कुलकर्णी यांच्या मातोश्री उज्वला कुलकर्णी, तसेच आजी सुनंदा जोशी आणि अनेक पालक रसिक उपस्थित होते. शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प, तुळशीचे रोप देऊन पाहुण्यांचे व सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भार्गवी म्हेत्रस यांनी केले. महादेवी व प्रसाद म्हेत्रस यांनी कार्यक्रमासाठी उत्तम सहकार्य केले.



# FORM A
## PUBLIC ANNOUNCEMENT

(Under Regulation 6 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)

**FOR THE ATTENTION OF THE CREDITORS OF REPLENISH REALITY PRIVATE LIMITED**

**RELEVANT PARTICULARS**

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of corporate debtor | Replenish Reality Private Limited |
| 2 | Date of incorporation of corporate debtor | 02.02.2007 |
| 3 | Authority under which corporate debtor is incorporated / registered | Registrar of Companies, Mumbai |
| 4 | Corporate Identity No. / Limited Liability Identification No. of corporate debtor | U45200MH2007PTC167457 |
| 5 | Address of the registered office and principal office (if any) of corporate debtor | 507, 5th Floor, Vyapar Bhavan, 49, P.D' Mello Road, Carnac Bunder, Mumbai, 400009, Maharashtra, India |
| 6 | Insolvency commencement date in respect of corporate debtor | 17.04.2024 (order received on 20.04.2024) |
| 7 | Estimated date of closure of insolvency resolution process | 14.10.2024 |
| 8 | Name and registration number of the insolvency professional acting as interim resolution professional | Ms. Shubham Agarwal Goyal Registration No. - IBBI/IPA-002/IP-N01000/2020-2021/13229 |
| 9 | Address and e-mail of the interim resolution professional, as registered with the Board | Rosewood Estate, B-404, Prernatirth Derasar Road, Satellite, Ahmedabad-380015, Gujarat Email id: fcs.shubhamgoyal@gmail.com |
| 10 | Address and e-mail to be used for correspondence with the interim resolution professional | A-402, "Aaryabhumi", Opp. M.G. Party Plot, Jodhpur Char Rasta, Satellite, Ahmedabad-380015, Gujarat Email id: cirp.rrpl@gmail.com |
| 11 | Last date for submission of claims | 05.05.2024 |
| 12 | Classes of creditors, if any, under clause (b) of sub-section (6A) of section 21, ascertained by the interim resolution professional | NA |
| 13 | Names of Insolvency Professionals identified to act as Authorised Representative of creditors in a class (Three names for each class) | NA |
| 14 | (a) Relevant Forms and (b) Details of authorized representatives are available at: | a) Web link : https://ibbi.gov.in/en/home/downloads b) NA |

Notice is hereby given that the National Company Law Tribunal, Mumbai bench has ordered the commencement of a corporate insolvency resolution process of the "Replenish Reality Private Limited" as on 17.04.2024 (order received on 20.04.2024) and appointed Interim Resolution Professional (IRP) through same order.

The creditors of Replenish Reality Private Limited are hereby called upon to submit their claims with proof on or before 05.05.2024 to the interim resolution professional at the address mentioned against entry No. 10.

The financial creditors shall submit their claims with proof by electronic means only. All other creditors may submit the claims with proof in person, by post or by electronic means.

A financial creditor belonging to a class, as listed against the entry No. 12, shall indicate its choice of authorised representative from among the three insolvency professionals listed against entry No.13 to act as authorised representative of the class [NA] in Form CA.

Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties.

**Sd/-**
**Shubham Agarwal Goyal**
**Interim Resolution Professional of**
**Replenish Reality Private Limited**
**Registration No. IBBI/IPA-002/IP-N01000/2020-2021/13229**
**AFA No. AA2/13229/02/281124/203037**

**Date- 22.04.2024**
**Place- Mumbai**


# संविधान बचाव नावाने विरोधकांनी प्रचाराची वैचारिक पातळी खाली आणलीय : सुनिल तटकरे




**अलिबाग, दि. २१ (वार्ताहर) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अल्पसंख्याक समाजासाठी केलेले काम, नारी शक्तीसाठी घेतलेले निर्णय, केलेल्या पायाभूत सुविधा...व इतर महत्वपूर्ण निर्णय लक्षात घेता सध्या विरोधकांकडील प्रचाराचे मुद्दे संपल्याने विरोधकांनी संविधान बचाव नावाने ओरड सुरू केली असून प्रचाराची वैचारिक पातळी खाली आणल्याची खंत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनिल तटकरे यांनी व्यक्त केली.

संविधान बचावच्या नावाने वातावरण दुषित केले जात आहे. मात्र देशातील जनता सुज्ञ आहे. देशाला विकासाच्या प्रगतीपथावर कोण नेत आहे याची जाण जनतेला आहे अशा शब्दात सुनिल तटकरे यांनी विरोधकांना ठणकावून सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींचे काम आपण घराघरात पोचवायचे आहे. भविष्यात नविन मतदारांना मतदानासाठी आणावे लागेल आणि त्यांना आपल्याकडे वळवण्यासाठी प्रयत्न करावा लागेल. अर्ज दाखल करताना 'जिंकायचेच' या उत्स्फुर्तपणे महायुतीचे लोक आले होते त्याबद्दल सुनिल तटकरे यांनी कौतुक करतानाच आता कुणीही गाफील राहू नये. सतर्कने घराघरात घड्याळ हे चिन्ह पोचवायचे आहे. ग्रामीण भागात आपली पकड घट्ट आहे परंतु शहरात आपल्याला ताकदीने काम करावे लागणार आहे असेही सुनिल तटकरे म्हणाले.

## महायुतीच्या अलिबाग शहर कार्यकर्त्यांची आढावा बैठक

या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनिल तटकरे, आमदार महेंद्र दळवी, महेश मोहिते, आदींसह महायुतीचे शहर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.


OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

# ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

सीआयएन : U67100TZ2014PTC020363
**कॉर्पोरेट कार्यालय :** कोहिनूर स्क्वेअर, ४७ वा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर (प), मुंबई ४०० ०२८.
**ईमेल** mumbai@omkaraarc.com **मो.** +९१ ९७६९१७०७७४/+९१ ९०८२०८०७८९

**(परिशिष्ट ४-ए) (नियम ८(६) अनुच्छेद नियम ९(१) ची तरतूद पाहावी) स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलावाकरिता जाहीर सूचना**

**सीक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफैसी कायदा) सहवाचिता सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) व नियम ९(१) अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.**

सूचना याद्वारे आम जनतेस देण्यात येते की, खालील नामित कर्जदार व हमीदार यांनी खालील निर्देशित स्थावर मालमत्ता गहाण/ प्रभारित असलेल्या मालमत्तेचे प्रतिभूत धनको यांच्याद्वारे ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांचे प्राधिकृत अधिकारी यांच्याद्वारे ताबा घेण्यात आला आहे. पुढे, ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (ओमकारा पीएस ३३/२०२०-२१ ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून कार्यरत) यांनी अभिहस्तांकन करार दि. ३०.०३.२०२१ अंतर्गत एडलवीज हाउसिंग फायनान्स लिमिटेड (असायनर) यांच्याकडून संपूर्ण थकित रक्कमेचे प्रदान करण्याकरिता ताबा घेतला आहे व पुढे, ओएआरपीएल यांनी प्रतिभूतीच्या स्वरूपात थकबाकी वसुली करण्याकरिता पावले उचलली आहेत. ओएआरपीएल यांचे प्राधिकृत अधिकारी हे याद्वारे प्रतिभूत मालमत्तेच्या खरेदीकरिता मोहोरबंद लिफाफामधून निविदा/ बोली मागवीत आहेत व वसुली करण्याकरिता खालील निर्देशित प्रतिभूत मालमत्तेची विक्री करण्यास इच्छुक आहेत. मालमत्तेची विक्री सरफैसी कायद्याच्या अनुच्छेद १३(२) व (४) अंतर्गत तरतूदी अंतर्गत हक्कांची विक्री करत आहेत व जशी आहे जेथे आहे, जी आहे जशी आहे तत्त्वावर व कुठेही असण्याच्या तत्त्वावर करण्यात येत आहे व ओएआरपीएल यांना संबंधित कर्जदार व सह-कर्जदार खालील निर्देशित अनुसार प्रतिभूत धनको म्हणून आहेत. कर्जदार/ हमीदार/ गहाणवटदार यांचा तपशील, प्रतिभूती, थाकित रक्कम, मागणी सूचना दिनांक अनुच्छेद १३(२) अंतर्गत राखीव मूल्य, बोली विस्तार रक्कम, इसारा रक्कम ठेव (इरठे), पडताळणीची तारीख व वेळ खालीलप्रमाणे आहे :

| | | |
|---|---|---|
| **कर्जदार/ हमीदार/ गहाणवटदार यांचे नाव :** १. रवी विश्वेश्वर कालमेघ (कर्जदार), २. रेश्मा रवी कालमेघ (सह-कर्जदार) | | |
| **प्रतिभूत मालमत्तेचा तपशील :** सर्व तो भाग व भूखंड असलेला फ्लॅट क्र. ४ तळ मजला, सिद्धी अपार्टमेंट बतसाई रोड वाशींद ठाणे, शनीमंगल कार्यालयजवळ, सर्व्हे क्र. १०९/३/६ गाव वाशींद, दि कारपेर क्षेत्र, सदर अपार्टमेंट ३०.६७ चौरस मीटर (३१६.३५ चौ. फूट चटई), ठाणे ४२१ ६०४. **सदर फ्लॅटच्या सीमा खालीलप्रमाणे : उत्तर :** रोड, **दक्षिण :** बंगलो, **पूर्व :** बंगलो, **पश्चिम :** खुला प्लॉट. | | |
| **मालमत्तेचे मालक :** रवी विश्वेश्वर कालमेघ | **मागणी सूचना दिनांक व रक्कम :** दि. २८.०२.२०२० रोजी रु. १७,९८,४२६.१४/- (रु. सतरा लाख अठ्ठयाण्णव हजार चारशे सव्वीस व चौंदा पैसे मात्र) | |
| **राखीव मूल्य : रु. १८,०३,०००/-** | **बोली विस्तार रक्कम :** रु. १०,०००/- | **इरठे :** रु. १,८०,३००/- |
| **मालमत्तेच्या पडताळणीची तारीख व वेळ : दि. ०२.०५.२०२४ रोजी ११.०० ते १.०० पर्यंत** | **ई-लिलाव तारीख व वेळ : दि. ०८.०५.२०२४ रोजी स. ११.०० ते १२.०० पर्यंत** | |
| **सहभागाचे बोली पत्र/ केवायसी दस्तावेज/ इरठे पुरावे यांच्या सादरीकरणाकरिता अंतिम तारीख व वेळ : दि. ०७.०५.२०२४ रोजी ६.०० वा.** | | |

**लिलावाच्या अटी व शर्ती :** विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया प्रदानित लिंक http://omkaraarc.com/auction.php पाहावी.

ओएआरपीएल मार्फत ऑनलाइन लिलाव आयोजित केला आहे. बोली सादरीकरणाची अंतिम तारीख (ऑनलाइन तसेच हार्ड कॉपी) तसेच इरठे (डीडी/पे ऑर्डर मूळ वा एनईएफटी/आरटीजीएस मार्फत कपात) दि. **०७.०५.२०२४** रोजी ६.०० वा. आहे. इच्छुक बोलीदारांनी इरठे जमा करणे आवश्यक आहे व लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करून, अपलोडींग डाटा, बोली सादर करणे, ई-बोली प्रक्रिया आदी ट्रेनिंग करून ई-लिलाव सेवा प्रदाते **मे. सी१ इंडिया प्रा. लि., दूर. हेल्पलाईन +९१-७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाईन ईमेल आयडी : support@bankeauctions.com, हेल्पलाईन ईमेल आयडी : support@bankeauctions.com, श्री. भाविक पांड्या, मो. क्र. ८८६६६८२९३७ वर संपर्क साधावा व ईमेल : maharashtra@c1india.com करावा व कोणतीही मालमत्ता संबंधित चौंकशी असल्यास प्राधिकृत अधिकारी, श्री. तानाजी मांडवकर यांना मो. +९१ ९७६९१७०७७४, +९१ ९०८२०८०७८९ ईमेल : tanaji@omkaraarc.com करावा.**

**सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) अनुच्छेद ९(१) अंतर्गत विक्रीकरिता वैधानिक सूचना**

सदर सूचना सीक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत वरील कर्ज खाते कर्जदार/ हमीदार यांना १५ (पंधरा) दिवसांची सूचना देणे अनिवार्य आहे व वरील संदर्भित तारीख व वेळे अनुसार जाहीर लिलाव मार्फत विक्री धारक यांना सूचित करण्यात येते की, ते मालमत्ता कपात करण्याकरिता इच्छुक आहेत व वरील संदर्भित थकबाकीचे प्रदान पुढील व्याज, मूल्य व त्यावरील खार्च यांच्यासह करतील. जर प्रदान करण्यास कसूर झाल्यास मालमत्ता प्राधिकृत अधिकारी/ प्रतिभूत धनको यांच्या सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या विहित नियम ८(५) अंतर्गत कोणत्याही प्रकारे विक्री करण्यात येईल.

**सही/-**
**दि. २२.०४.२०२४**
**ठिकाण : मुंबई**
**प्राधिकृत अधिकारी, ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**
**(ओमकारा पीएस ३३/२०२०-२१ ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून कार्यरत)**